महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN of The Corporation
U92100MH1977SGC019882

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.
दुरध्वनी क्र. : २८४० १५३३, २८४० १७५५, २८४९ ७५०० फॅक्स : २८४० ०७३४

अ.क्र.दाफाचि/कलागारे-२०२०/ ४९७
दि. १६.०६.२०२०

# आदेश

संदर्भ :-१) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
क्र.कोचिन-२०२०/प्र.क्र.३७/सां.का.१, दिनांक ३०.५.२०२०
२) महामंडळाची दिनांक १६.३.२०२० ची नोटीस

कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १६.३.२०२० अन्वये जारी केलेल्या नोटीसीनुसार तसेच वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार चित्रनगरीत चित्रीकरण बंद करण्यात आले होते. शासनाने पुर्नविचारांती काही निर्बंध आवश्यकतेनुसार शिथिल करुन कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर बंद करण्यात आलेले चित्रपट/मालिका/OTT यांची चित्रीकरण कामे नियंत्रित पध्दतीने सुरु करण्यास संदर्भाधीन दिनांक ३०.५.२०२० च्या शासन निर्णयान्वये व त्या सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांचे (सोबत प्रत जोडण्यात आली आहे) पालन करण्याच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली आहे.

त्यास अनुलक्षून दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव, मुंबई येथे चित्रपट/मालिका/OTT यांची चित्रीकरण कामे सुरु करण्यासाठी विहित केलेल्या पध्दतीने आरक्षण करुन व संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक ३०.५.२०२० चा शासन निर्णय व त्या सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याच्या अधीन राहून दि.१५.६.२०२० पासून परवानगी देण्यास सुरु केले आहे. चित्रपट/मालिका/OTT चे चित्रीकरण करण्यास परवानगी घेण्यासाठी सोबत वेगवेगळे अर्जाचे नमुने सादर करण्यात आले असून त्या विहित नमुन्यात संबंधित कंपनीच्या लेटरहेडवर अर्ज महामंडळास सादर करावे.

(मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या आदेशानुसार )

सहपत्र-वरीलप्रमाणे

(संगिता शेळके)
व्यवस्थापक (कलागारे)